14

-: परिशिष्ट - क :-

लक्ष्य फांऊडेशन,पारोळा ता.पारोळा जि.जळगाव

Ex. 3

## नियम व नियमावली

Ex 10

१. **नियमावलीतील संदर्भीय शब्दांची व्याख्या :-**

संस्था म्हणजे :- **लक्ष्य फांऊडेशन,पारोळा ता.पारोळा जि.जळगाव** असे समजण्यात येईल.

अध्यक्ष म्हणजे :- **लक्ष्य फांऊडेशन,पारोळा ता.पारोळा जि.जळगाव** या संस्थेचा अध्यक्ष असे समजण्यात येईल.

उपाध्यक्ष म्हणजे :- **लक्ष्य फांऊडेशन,पारोळा ता.पारोळा जि.जळगाव** या संस्थेचा उपाध्यक्ष असे समजण्यात येईल.

सचिव म्हणजे :- **लक्ष्य फांऊडेशन,पारोळा ता.पारोळा जि.जळगाव** या संस्थेचा सचिव असे समजण्यात येईल.

सदस्य म्हणजे :- **लक्ष्य फांऊडेशन,पारोळा ता.पारोळा जि.जळगाव** या संस्थेचा सदस्य असे समजण्यात येईल. संस्थेच्या कार्यकारी मंडळ सदस्य असे समजले जाईल.

सर्व साधारण सभेचा सदस्य म्हणजे :- **लक्ष्य फांऊडेशन,पारोळा ता.पारोळा जि.जळगाव** या संस्थेचा कोणतेही प्रकारचा सभासद म्हणजे त्यास सर्वसाधारण सभेचा सदस्य असे समजले जाईल.संस्थापक सदस्य केवळ विधान पत्रावर सह्या करणाऱ्या या सदस्यांना संस्थापक सदस्य असे म्हटले जाईल.

२. कार्यक्षेत्र :- या संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र पुरते मर्यादीत राहील.

३. हिशोब वर्ष :- या संस्थेचे हिशोब वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील.

| अध्यक्ष/सही | उपाध्यक्ष/सही | सचिव/सही |
|---|---|---|
| x | भोली भगवान मराठे x | सपना रोशन मराठे x |

LAKSHAYA FOUNDATION MAHARASHTRA Reg.No. F-15079 JALGAON PAN NO. AAAAL6938P

For Lakshaya Foundation

President Secretary

S.R.Marathe

## सभासद व त्याची नोंदणीची पध्दत :-

कोणत्याही वय वर्षे १८ पुर्ण असलेल्या भारतीय स्त्री/पुरुषाला संस्थेचे सभासदत्व प्राप्त करता येईल. त्याकरीता तिला/त्याला संस्थेकडे रितसर अर्ज करावा लागेल. आलेल्या अर्जाचा कार्याकारी मंडळाने मंजूरी दिल्यावर सभासदांची निर्धारीत वर्गणी संस्थेत जमा केल्या नंतर त्यांची नोंदणी सभासद यादीमध्ये करण्यात येईल.

५. **सभासदाचे प्रकार :- सभासदाचे प्रकार पुढील प्रमाणे असतील.**

१. संस्थापक सभासद :- संस्थेला रूपये ५०१/-एक रकमी एकदाच वर्गणी देणाऱ्या व विधान पत्रावर सह्या करणाऱ्या व्यक्तिला संस्थापक सभासद (आजीव) म्हणुन समजण्यात येईल.

२. आजीव सभासद :- संस्थेला रूपये ५११/- एक रकमी एकदाच वर्गणी देणाऱ्या व्यक्तिला आजीव सभासद म्हणुन समजण्यात येईल.

३. सर्वसाधारण सभासद :- संस्थेला रूपये १०१/- एक रकमी एकदाच वार्षीक वर्गणी देणाऱ्या व्यक्तिला सर्व साधारण सभासद म्हणुन समजण्यात येईल.

## ६. सभासदत्व रद्द होणे :-

कोणीही कायदेशीर गुन्हेगार ठरला असेल सभासद वर्गणी दिली नसेल, मरण पावला असेल. देश सोडून परदेशात कायम वास्तव्यास गेला असेल, व्यसनी असेल किंवा गैरवर्तन करीत असेल. संस्थेला नुकसान पोहचवित असेल. असे निदर्शनास आल्यास किंवा अन्य कारणावरून कार्यकारी मंडळाने बहुमताने ठराव मंजूर करून काढून टाकल्यास सभासदत्व रद्द झाले असे समजण्यात येईल.

## ७. सर्वसाधारण सभा, तिचे अधिकार व कार्य :-

सर्वसाधारण सभा ही संस्थेची सर्व श्रेष्ट व शेवटचा निर्णय देणारी सभा म्हणुन समजण्यात येईल ही सभा वर्षातून एकवेळ तरी घेतली पाहिजे. या सभेत सर्व प्रकारचे सभासद भाग घेवू शकतील कार्यकारी मंडळाने चालविलेल्या कार्यांवर नियंत्रण ठेवणे. वार्षिक हिशोब मंजूर करणे, पुढील नवीन वर्षाने अंदाजपत्रकाला मंजूरी देणे, आवश्यक्तेनुसार नियमात बदल करणे, कार्यकारी मंडळाच्या अधिकाऱ्यांची निवड करणे, वेळेवर येणाऱ्या या टरावावर निर्णय देणे.

## ८. सर्वसाधारण सभेची सुचना व गणसंख्या :-

सर्वसाधारण सभेची सुचना संस्थेच्या सर्व सभासदांना देणे आवश्यक राहील. सुचनेमध्ये दिनांक, वेळ, स्थळ व सभेचे विषय नमुद असावे. सुचना सर्व सभासदांना संस्थेच्या डाक बुकावर सही घेवून देता येईल. अगर रजि. पोष्टाने टपाल द्वारे पाठविता येईल. सुचना सभेच्या पंधरा दिवस अगोदर पाठविणे आवश्यक राहील. एकुण सभासद संख्येचा ३/५ सभासद उपस्थित झाल्यास सभेची गणसंख्या पुर्ण झाली असे समजण्यात येईल. गणसंख्येअभावी सभा स्थगीत झाल्यास स्थगीत सभेला कोरमचे बंधन राहणार नाही, परंतु अशी टिप सुचनापत्रात असणे आवश्यक असेल.

LAKSHAYA FOUNDATION Reg.No. F-15079 JALGAON PAN NO. AAAAL6938P MAHARASHTRA

For Lakshaya Foundation

अध्यक्ष/सही | उपाध्यक्ष/सही | सचिव/सही

President | Secretary

९. **विशेष सर्वसाधारण सभा व तिचे कार्य :-**

अशी सभा आवश्यक्तेनुसार केंव्हाही घेता येईल, जे कार्य सर्वसाधारण सभा करू शकते ती सर्व कार्य करण्याचा अधिकार विशेष सर्वसाधारण सभेला राहील.

१०. **संस्थेचे कार्यकारी मंडळ, पदाधिकारी यांची रचना :-**

संस्थेच्या कार्यकारी मंडळात **७**, व्यक्ति असतील, **अध्यक्ष** - १, **उपाध्यक्ष** - १ , **सचिव** -१, **सभासद**- ४,

११. **कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणूकीची पध्दत :-**

कार्यकारी मंडळाचा कार्यकाल पाच वर्षाचा राहील. निवडणूकीची गुप्त मतदान पध्दतीने दर पाच वर्षाने वार्षिक सर्वसाधारण सभेत निवडले जाईल. कार्यकारी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची निवड सर्वसाधारण सभे मध्ये केली जाईल.

१२. **कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी व त्याचे काम :-**

अध्यक्ष :- सभेचे अध्यक्षस्थान स्विकारणे सभेचे कामकाज चालविणे व संस्थेचे हितसंबंधीतांना योग्य ते आदेशदेणे संस्थेच्या कारभारावर व शाखावर नियंत्रण ठेवणे. सर्व प्रकारच्या सभा बोलविणे बाबत संस्थेच्या सचिवास निर्देश देणे. कोणत्याही प्रश्नावर समानमते पडल्यास निर्णायक मते देणे. संस्थेच्या नियमावली नुसार तसेच मंजूर झालेल्या ठरावानुसार संस्थेचे कार्य चालविण्याची दक्षता घेणे कामकाजाबाबत योग्य ते निर्देश देणे व कार्यवाही करणे.

उपाध्यक्ष :- अध्यक्षाच्या कामात मदत करणे व अध्यक्षांच्या गैरहजेरीत अध्यक्षांची कामे करणे.

सचिव :- संस्थेच्या सभा बोलविणे, संस्थेचा पत्रव्यवहार करणे, संस्थेच्या कर्मचाऱ्यावर लक्ष ठेवणे, किरकोळ नियम तयार करणे, संस्थेच्या दृष्टीने आवश्यक ती न्यायालयीन कामे करणे. वार्षिक हिशोबाची पत्रके तयार करणे व ती सर्वसाधारण सभेपुढे मंजूरीसाठी ठेवणे. दैनंदिन हिशोब तपासून त्यावर सह्या करणे. खर्चाची बिले करणे. संस्थेच्या वतीने रकमांची देवाण घेवाण करणे. संस्थेच्या मालमत्तेची देखभाल करणे. संस्थेच्या आर्थिक परिस्थितीवर कार्यकारी मंडळापुढे मंजूरीस्तव ठेवणे. हिशोबाच्या पुस्तकातून वार्षिक पत्रके तयार करणे. रकमांची देवाण घेवाण, हिशोब तपासणीस यांनी हिशोब तपासतांना काढलेल्या तृटीची पुर्तता करणे.

कार्यकारी मंडळाचे इतर सदस्य :-कार्यकारी मंडळाच्या व सर्वसाधारण सभेत उपस्थित राहाणे. निवडणूकीचे वेळी मतदान करणे. संस्थेच्या कामकाजात इतर पदाधिकाऱ्यांना मदत करणे.

१३. **कार्यकारी मंडळाची सभा व मागणी सभासद :-**

कार्यकारी मंडळाच्या वर्षातून कमीत कमी ३ सभा घेण्यात येतील. संस्थेच्या कोणत्याही सभासदांनी मागणी केल्यास अध्यक्षांनी किंवा सचिवांनी कार्यकारी मंडळाची सभा मागणी केल्यापासून १५दिवसाच्या आत बोलविण्याचे बंधन राहिल, अशी सभा बोलवितांना सुचनापत्रात मागणीचे विषय नमुद करणे आवश्यक राहिल. मागणीच्या सभेला कार्यकारी मंडळाचे सर्व अधिकार राहतील.

LAKSHAYA FOUNDATION Reg.No. F-15079 JALGAON PAN NO. AAAAL6938P MAHARASHTRA

For Lakshaya Foundation

x
अध्यक्ष/सही

x
उपाध्यक्ष/सही

x
सचिव/सही S. R. Marathe

President Secretary

17

१४. **कार्यकारी मंडळाच्या सभेची सुचना व गणसंख्या :-**

कार्यकारी मंडळाच्या निवडणूकीचे नियम सर्वसाधारण सभा ठरविला त्याप्रमाणे राहतील. ज्यात वेळ, ठिकाण व सभेचे विषय नमूद करणे आवश्यक राहील. सुचना संस्थेच्या डाकबुकात सही घेवून अथवा टपालाद्वारे रजि.पोस्टाने पाठविता येईल. कार्यकारी मंडळाचे २/३ सभासद उपस्थित झाल्यास गणसंख्या पुर्ण झाली असे समजण्यात येईल.

१५. **कार्यकारी मंडळाच्या निवडणुकीचे नियम :-**

१. कार्यकारी मंडळाची निवड प्रत्येकी ५ वर्षांनी सर्वसाधारण सभेत बहुमतांनी होईल.
२. संस्थेची कोणत्याही प्रकारची बाकी येणे असल्यास निवडणुकीसाठी तो सदस्य अपात्र असेल.
३. निवडणुक अधिकाऱ्यांची नियुक्ती ३० दिवसापूर्वी कार्यकारी मंडळ करील.
४. एक वर्षभर साधारण सभासद असल्यावरच मतदानाचा अधिकार राहिल.
५. निवडणूक गुप्त मतदान पध्दतीने करण्यात येईल.
६. निवडणूक अधिकाऱ्यांस पदाधिकारी म्हणून निवडणूकीस उभे राहता येणार नाही व फक्त निकाली मत देता येईल.
७. कार्यकारणीचा पदाधिकारी किंवा सदस्य या एकाच जागेसाठी निवडणुकीस उभे राहता येईल.
८. निवडणुकीस उभे राहणाऱ्या सभासदास निवडणूक अधिकाऱ्यांने अपात्र ठरविल्यास त्याचा योग्य तो खुलासा लेखी स्वरूपात अर्ज आल्यास निवडणूक अधिकारी करतील परंतु निवडणूक पुढे ढकलता येणार नाही.

१६. **कार्यकारी मंडळातील रिक्त पदे भरण्यांबाबत :-**

कार्यकारी मंडळातील पद अथवा जागा नियम क्रमांक ६, प्रमाणे व पुढील कारणाने सभासद मुत्युमुळे राजीनामा दिल्यामुळे व तो कार्यकारी मंडळातील पद रिक्त झाल्यास उर्वरीत संख्येच्या सर्व सभासदांतुन उर्वरीत कालावधीसाठी त्यांचे बहुमताने रिक्त पद वा जागा भरून काढतील

१७. **कार्यकारी मंडळाचे अधिकार व कर्तव्य :-**

(अ) संस्थेच्या उद्देशाकरीता निधी जमा करणे, वाढवीणे त्याचा विनीयोग करणे योग्य अशी गुंतवणूक करणे.देणग्या,शासकीय व निमशासकीय अनुदान स्विकारणे.

(ब) ट्रस्ट कायदा १९५० व त्या खालील नियंमाना अनुसरून संस्थेच्या उद्देश पुर्तीसाठी कर्ज घेणे.व ठेवी स्विकारणे.

(क) दैनंदिन खर्चाचे अंदाजपत्रक मंजुर करणे व त्या खालील रक्कम मंजुर करणे.व खर्चास वेळोवेळी मंजुरी देणे.

(ड) ट्रस्ट कायदा १९५० च्या नियंमाना आधिन राहुन संस्थेच्या नावाने जंगम व स्थावर मिळकत खरेदी करणे.

(इ) संथेच्या उपक्रमाकाच्या व योजनांच्या अमंलबजावणीसाठी आवश्यक त्या विषय समीत्या व पोस्टसमीत्या नेमणे. त्याची सदस्य संख्या कार्यकाल ,कार्यक्षेत्र कार्यपदध्ती अर्थ व्यवस्था वगैरे सर्व ठरवीणे. तसेच त्यासमीत्यामध्ये सर्व सदस्यामधुंन योग्य व अनुभवी व तज्ञ व्यक्तीस नेमणे.

(फ) आवश्यक तो नोकर वर्ग नेमणे.त्याची सदस्य संख्या कार्यकाल कार्यक्षेत्र,कार्यपध्दती,अर्थ व्यवस्था,वगैरे सर्व ठरवीणे तसेच त्या समीत्यामध्ये सर्व सदस्यांमधुन योग्य व अनुभवी तज्ञ व्यक्तीस नेमणे.

(ग) कार्यकारी मंडळावर मुदती आधी जागा रिकामी झाल्यास ती बहुमताने भरून काढणे. संस्थेच्या अंतंगत चालणाऱ्या इतर शाखावर नेमणुक करणे.

(ह) सनदी लेखापाल (ऑडीटर) यांची नेमणुक करणे.

(प) तसेच ट्रस्ट नोदंणी कायदा १९५० व संस्था नोंदणी कायदा १८६० व संस्था (२१) ला अनुसरून उद्देश पुर्तीसाठी कार्य करणे.

LAKSHAYA FOUNDATION Reg.No. F-15079 JALGAON PAN NO. AAAAL6938P MAHARASHTRA

For Lakshaya Foundation

President　Secretary

S.R.Merothe

x　x

अध्यक्ष/सही　उपाध्यक्ष/सही　सचिव/सही

१८. **संस्थेची निधी मिळकत व विनीयोग :-**

सभासद फी, देणगी, वर्गणी, अनुदान, स्थावर व जंगम मालमत्तेपासून येणारे उत्पन्न इ. संस्थेचे उत्पन्नाची साधने राहतील. संस्थेच्या उद्देशपुर्तीकरीता निधी गोळा करता येईल व ती स्थावर स्वरूपाच्या मिळकतीसाठी गुंतविता येईल. अशा मिळकतीची नोंद मा. सहाय्यक संस्था निबंधक तसेच मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालयात बदल अर्जाद्वारे त्यांच्याकडे असलेल्या नोंद रजिष्टरला करून घ्यावी लागेल.

१९. **उद्दिष्टनिहाय खर्चाची तरतूद (टक्केप्रमाणे) :-**

१. शैक्षणिक उद्देशावर - २० टक्के  २. सामाजिक - २० टक्के
३. सांस्कृतिक - २० टक्के  ४. कृषी - २० टक्के
५. वैद्यकीय - २० टक्के या नुसार खर्च करण्यात येईल एकूण - १०० टक्के

२०. **कर्ज किंवा ठेवी या संबंधीची तरतुद :-**

संस्थेला उद्दीष्ट पुर्तीसाठी सार्वजनीक न्यास नोदंणी आधिनिंयम १९५० चे कलमास अधिन राहुन कार्यकारी मंडळाचे टरावानुसार अध्यक्ष व सचिव संस्थेस लागणारी कर्ज घेतील व ठेवी स्विकारतील व या कर्जाचा व ठेवीचा योग्य तो वापर झाला किंवा नाही जवाबदारी कार्यकारी मंडळावर राहील .कर्ज व ठेवी मा.धर्मदाय सहआयुक्त,नाशीक यांची पुर्व परवानंगी घेण्यात येईल.

२१. **स्थावर मालमत्ता खरेदी विक्री करणे बाबतची तरतुद :-**

संस्थेला स्थावर मालमत्ता खरेदी करणे, तसेच विक्री करणेचा अधिकार राहील. संस्थेला त्याकरीता कार्यकारी मंडळाची बहुमताने संमती घ्यावी लागेल. संस्थेची स्थावर मालमत्ता विक्री करावयाची असल्यास ती विकण्यापुर्वी मा.धर्मदाय सहआयुक्त नाशिक यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

२२. **बँक खाते :-**

संस्थेजवळ शिल्लक असलेली रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत किंवा मान्यता प्राप्त बँकेत (शेड्युल) संस्थेच्या नावाने ठेवता येईल.अध्यक्ष, उपाध्यक्ष , सचिव ,या पदाधिकाऱ्यांपैकी कोणाच्याही दोन पदाधिकाऱ्यांच्या संयुक्त सहीने रक्कम काढता येईल. मात्र अध्यक्ष यांची आवश्यक सही अशी राहील.

२३. **सभासदांची यादी ठेवण्याची पध्दत :-**

१८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १५ अ प्रमाणे संस्थेचे जे सभासद असतील त्यांची एक यादी सन १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियमातील कलम १५ प्रमाणे अनुसूची सहाचे नमुन्यात ठेवण्यात येईल. १८६० च्या संस्था नोंदणी अधिनयमातील कलम ४ प्रमाणे व सन १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम ७ प्रमाणे दरवर्षी कार्यकारी मंडळाची यादी अनुसूची एकच्या नमुन्यात आपले विभागाचे मा. सहाय्यक संस्था निबंधक यांचे कार्यालयात पाठवावी लागेल.१८६० च्या संस्था नोंदणी अधिनियम कलम ४ प्रमाणे व सन १९७१ चे संस्था नोंदणी महाराष्ट्र नियम ८ प्रमाणे दरवर्षी संस्थेत नोकरीस लागलेल्या व्यक्तींच्या नोकरीसंबंधी अटींबाबतचे विवरण अनुसूची दोन या नमुन्यात आपले विभागाचे मा. सहाय्यक संस्था निबंधक जळगांव यांचे कार्यालयात पाठवावी लागेल.

For Lakshaya Foundation
Reg.No. JALGAON AAAAL6938P
MAHARASHTRA

President  Secretary

| अध्यक्ष/सही | उपाध्यक्ष/सही | सचिव/सही |
|---|---|---|

१९

## नियम व नियमावलीतील बदल करण्याची तरतूद :-

संस्थेच्या ह्या नियमावलीत बदल करणे व नविन नियंमाचा अंतर्भाव करणे यासाठी वार्षिक सर्व साधारण सभेत अथवा विशेष सर्व साधारण सभेत ३/५ मताधिक्याने मंजुरी मिळवावी लागेल.

२५. **संस्थेच्या नांवात किंवा उद्देशात करण्याची तरतुद :-**

संस्थेच्या नांवात किंवा उद्देशात बदल करावयाचा असल्यास अथवा दोन संस्था विलीनीकरण करावयाचे असल्यास १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १२ अथवा १२ अ प्रमाणे कार्यवाही पुर्ण करावी लागेल.

२६. **विसर्जन :-**

संस्थेचे कार्य बंद करावयाचे असल्यास ३/५ सभासदांच्या बहुमताने सर्वसाधारण सभेत मंजूरी घ्यावी लागेल. संस्थेचे सर्व प्रकारचे देणे-घेणे बाबतचे व्यवहार पूर्ण करावे लागतील. तसेच संस्थेचे शिल्लक असलेली मालमत्ता अन्य दुसऱ्या संस्थेला दान म्हणून देता येईल. १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमातील कलम १३ व १४ प्रमाणे संस्था विसर्जनाची कार्यवाही पुर्ण करावी लागेल.

-: दाखला :-

प्रमाणित करण्यात येते की, **लक्ष्य फांऊडेशन,पारोळा ता.पारोळा जि.जळगाव** या संस्थेच्या नियमावलीची सत्य प्रत आहे.

ठिकाण :- **पारोळा**

दिनांक :-२२/७/२०१३

| अ.क्र. | नांव | हुद्दा | सही |
|---|---|---|---|
| १. | श्री. रोशन भगवान मराठे | अध्यक्ष | [signature] |
| २. | श्रसौ. बेबीबाई भगवान मराठे | उपाध्यक्ष | बेबीभगवान मराठे |
| ३. | सौ. सपना रोशन मराठे | सचिव | सपना रोशन मराठे |

x
अध्यक्ष/सही

बेबी भगवान मराठे
x
उपाध्यक्ष/सही

LAKSHAYA FOUNDATION
Reg.No.
F-15079
JALGAON
PAN NO.
AAAAL6938P
MAHARASHTRA

For Lakshaya Foundation
President
S.R.Marathe
Secretary
सपना रोशन मराठे
x
सचिव/सही

TRUE COPY
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय,जळगांव विभाग

१,

-: परिशिष्ट - ब :-

(मेमोरॅन्डम ऑफ असोसिएशन)

(१) संस्थेचे नांव :- लक्ष्य फांऊडेशन,पारोळा ता.पारोळा जि.जळगाव

(२) संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता :- द्वारा - श्री. प्रकाश सुकलाल भोसले

रा.- गंगा मातृछाया निवास भोसले गल्ली,पारोळा ता.पारोळा जि.जळगाव

Ex-9

(३) विश्वस्त व्यवस्थेचा हेतू :-

**शैक्षणिक** : - शिक्षणांची सोय करणे. विकास व उन्नतीचे प्रयत्न करणे. उदा. बालवाडी पासुन ते उच्च माध्यमिक विद्यालयापर्यंत शिक्षणांची सोय करणे. त्यात प्राथमिक, पुर्व प्राथमिक, माध्यमिक, तांत्रिक शाळा, सैनिक स्कुल, हवाई प्रशिक्षण सुरू करणे, कॉलेज (आय.टी.आय., पॉलीटेक्नीक कॉलेज), डि एड व बी. एड,कला, वाणिज्य व विज्ञान, विधी, कृषी, समाजशास्त्र,मेडीकल, हस्तकला, चित्रकला, इंजिनिअरींग, मेडीकल, नर्सिंग, महाविद्यालय सुरू करणे,मरीन इंजीनीरींग व सर्व प्रकारचे कॉलेज सुरु करणे. विविध व्यवस्थापन कोर्सस सुरू करणे, आश्रम शाळा (मुला-मुलींच्या) वस्तीगृहे, अंगणवाड्या प्रौढ शिक्षण वर्ग सुरू करणे, इंग्लीश मिडियम स्कुल काढणे अंध,अपंग, मुकबधीर विद्यार्थ्यांसाठी शिक्षणांची सोय करणे. वृध्दाश्रम काढणे. होतकरू विद्यार्थ्यांना पुस्तके, गणवेश, शिष्यवृत्या वाटप करणे, शेतकी शाळा सुरू करणे, संगणकाचे प्रशिक्षण वर्ग सुरू करणे. महिला मंडळातर्फे प्रौढ शिक्षण शिबीर सुरू करणे, संगणक प्रशिक्षण केंद्र (सॉफ्टवेअर आणी हार्डवेअर)चालविणे, टंकलेखन प्रशिक्षण संस्था,चालविणे, कृषी विद्यालय व महाविद्यालय चालविणे,डि.सी.ए. बी.सी.एस.एम.सी.ए.एस.सी.एस.इ. कोर्सेस चालविणे, तसेच आयुर्वेदिक महाविद्यालय,मेडीकल कॉलेज,फायर अॅन्ड सेफ्टी कॉलेज सुरु करणे.

**सांस्कृतिक** :- कला व गुणांना वाव मिळावा म्हणुन कलेच्या स्पर्धा आयोजित करून त्याद्वारे कलाकारांना प्रोत्साहन देणे, धार्मिक/सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करून भारतीय सांस्कृतीची जोपासना करणे, ग्राम पातळीवरील बालकांच्या व महिलांच्या कलागुणांना प्रोत्साहन साठी स्पर्धा आयोजित करणे, समाजाच्या सर्वांगीण विकासाठी प्रयत्न करणे, विविध सामाजीक उत्सव साजरे करणे. सांस्कृतीक कार्यक्रमाद्वारे विज्ञान विषयक जागृती करणे,विज्ञानविषयक प्रदर्शने आयोजित करणे,व्याख्यानमाला सुरु करणे,निबंध स्पर्धा वृकृत्वस्पर्धा ठेवणे,विज्ञान विषयक ज्ञानाचा प्रचार करणारा नाटके,भारुड वाप्रयोग करणे,कविता लेखा,नभोवाणी,दुरदर्शनाच्या माध्यमातुन विधान विषयक प्रचार व प्रसार करणे.

**वैद्यकिय** :- गरीब व गरजवंत लोकांना औषोधोपचारासाठी मदत करणे, धर्मार्थ, दवाखाना सुरू करणे. आरोग्य शिबीरे आयोजित करणे. औषोधोपचारासाठी मदत करणे, झोपडपट्टीतील ग्रामीण लोकांना मोफत अथवा माफक दरात आरोग्य सेवा पुरविणे,दवाखाना चालविणे,गर्भवती स्त्रीयांना लहान बालकांना आरोग्य विषय मदत करणे,कुटूंब नियोजनाचा प्रचार व प्रसार करणे,तरुण तरुणी मधील सर्व प्रकारचा व्यवसनाधिनता दुर करुन त्यांचे पुंर्नवसन करणे,

[Stamp endorsement, handwritten entries:]
अर्जदाराचे नाव - किरणसिंह
नक्कल शुल्क - 641
ती मिळाल्याचा दि. - 09/02/26
नक्कल तयार मिळण्याचा दि. - 20/01/26
नक्कल दिल्याचा दि. -
नक्कल तयार करणार -
नक्कल तपासणार करणार - 09/02/26
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
जळगांव विभाग,जळगांव

अध्यक्ष/सही

For Lakshaya Foundation
President
उपाध्यक्ष/सही

Secretary/सही

सामाजिक :- बहुउद्देशिय हॉल बांधणे,चालवणे व देखरेख करणे,अंधश्रध्दा निर्मुलन करणे,व लोकांना दैववादी दृष्टीकोन दुर करुन त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टीकोन रुजविणे,मागासवर्गीय व अर्थिदुष्ट्या दुर्वल घटकातील समाजासाठी व्यवसाय प्रशिक्षणच्या यांजना योजनांचा लाभ घेणे,त्यांच्या आर्थिक,सामाजीक,बौध्यीक,मानसिक शैक्षणीक विकास घडवुन आणणे, आश्रमशाळा,वृध्दाश्रम,अनाथश्रम सुरु करुन चालविणे अथवा चालविण्यासाठी घेणे,निराधार,अन्यायग्रस्त,गरीव महिला व युवक युवतीसाठी व्यवसाय प्रशिक्षण वर्ग चालविणे व मार्गदर्शन केंद्र सुरु करणे,वयात येणाऱ्या तरुण मुला-मुलींना व्यापक स्वरुपात लौंगीक शिक्षण व सामाजीक जवावदारी संघात प्रशिक्षण देणे,गुप्तरोग व व्यसना विरुध्द तरुणा मध्ये जागृती करणे, शासनाच्या व इतर संस्थेच्या ग्रामविकासाच्या योजना राववीणाऱ्या सक्रीय भुमीका वजावणे, शासनसच्या सेवाभावी तत्वावर चालणारे व्यवसाय चालविण्यासाठी योग्य मागदर्शन करणे, विविध सण साजरे करणे उदाः वुध्द पोर्णीमा साजरी करणे,सर्व आदरणीय राष्ट्रपुरुष यांच्या जयंत्या साजरे करणे तसेच त्यांचे स्मरणार्थ स्मृतिदिन साजरे करणे व त्यांच्या विचाराचा प्रचार व प्रसार करणे,शासनाच्या योजनांची माहिती देणे व मार्गदर्शन करणे, पुरग्रस्त,दंगलग्रस्त,आपादग्रस्त,नागरीकांना जिवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करणे,आणी नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्यांना मदत करणे व मार्गदशन करणे,समाजातील अंधश्रध्दा चुकीच्या रुढी प्रीयता नष्ट करण्यासाठी परिसंवाद परिचर्चा घडवुन आणणे आणी त्यातुन समाज प्रबोधन व परिर्वतन करणे,व्यसनमुक्ती शिवीर आयोजीम करणे,अंध,अपंग,निराधरांना व कमकुवत असलेल्या मदत करणे, विधवाश्रम स्थापन करणे,गृह उदयोगाचे प्रशिक्षण देवून त्यांना स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न करणे. पर्यावरणाचा समतोल राखणेसाठी वृक्षारोपन करणे. समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत, राज्य शासन व केंद्रीय शासनातर्फे चालविण्यांत येणाऱ्या महिला व वाल कल्याण योजनांचा लाभ घेणे व कार्यान्वयीत आणणे, सार्वजनिक वाचनालय सुरू करणे. महिलांना हस्तकलेचे प्रशिक्षण देणे. पाणलोट विकासाचे प्रयत्न करणे. स्वच्छता अभियान राबविणे. पुरूष व महिलांसाठी विविध कलेचे प्रशिक्षण देणे.मेंहदी रांगोळी व ब्युटीपार्लर चे प्रशिक्षण देणे, महिला व बालकल्याण विभागाच्या सर्व योजनांचा लाभ घेणे,गोशाळा सुरु करणे,अनाथ पशुंची सेवा करणे तसेच शाकाहारचा प्रचार व प्रसार करणे. ग्रामपंचायत व नगरपालिका,सार्वजनीक वांधकाम विभाग यांच्याकडुन येणाऱ्या महत्वाच्या योजना राववीणे, तहसील कार्यालयातील यांच्याकडुन येणाऱ्या महत्वाच्या योजनांचा लाभ घेणे, एकात्मीक वालविकास व जिल्हा परिषद विभागातुन येणाऱ्या योजनांचा लाभ घेणे, आदिवासींच्या कल्याणसाठी योजनाचा लाभ घेणे. सुविधा केंद्र चालवीणे, समाज प्रवोधन करुन जनजागृती करणे, विविध अभियान राबवीणे, वधु-वर परीचय व सामुहीक विवाह आयोजन करणे. वाल संस्कार केंद्र व चालवीणे, जनजागृती करणे, हुंडा प्रथा वंद करणे, वालविवाह प्रथा वंद करणे, तसेच नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मदत करणे, पुरुष व महिलांना वचतगटाचे प्रशिक्षण व मार्गदर्शन करणे, व्यायामशाळा चालविणे.

For Lakshaya Foundation

President

Secretary

S. R. Marathe

अध्यक्ष/सही

देवी भगवान मराठे
x
उपाध्यक्ष/सही

सपना रोशन मराठे
x
सचिव/सही

क्रिडा :- तरूणांमध्ये व्यायामाची गोडी निर्माण व्हावी म्हणुन व्यायाम शाळा सुरू करणे,क्रिडा स्पर्धा आयोजित करणे,तरूणांमध्ये खेळाडू वृत्ती निर्माण होण्यासाठी उत्तम दर्जाचे खेळाडू तयार होण्यासाठी सर्व प्रकाराच्या खेळांच्या स्पर्धा आयोजित करून विविध खेळांना/खेळाडूंना प्रोत्साहन देणे,विविध खेळांचे प्रशिक्षण शिबीर घेणे,विविध राज्य राष्ट्रीय पातळीवरील खेळांचे एकत्र शिबीर भरविणे,व्यायमासाठी समाज प्रबोधन करणे. लोकांना व्यायमाचे महत्वा पटविणे, तसेच आधुनिक व्यायाम शाळा महिला व पुरूषांच्या सुरू करून त्यांना प्रशिक्षण देणे,शारीरीक दृष्ट्या निरोगी राहणेसाठी वयोवृध्द तसेच युवक युवतींना प्रशिक्षण देवून त्यांना मार्गदर्शन करणे. महिला युवक व युवतींसाठी व्यायामशाळा सुरू करणे,शारीरीक शिक्षण शास्त्र महाविद्यालय सुरू करणे,बॉडी बिल्डरच्या स्पर्धा भरविणे तरूणांमध्ये खेळाची आवड निर्माण व्हावी म्हणुन कबड्डी, बास्केटबॉल,फुटबॉल,बेसबॉल,खो-खो, क्रिकेट, व्हॉलीबॉल, टेबलटेनीस, स्केटींग, हॉर्स राइडींग,शटल बॅडमिंटन,स्कॅश ब्रिज,खो-खो,कुस्ती,तलवारबाजी,नेमबाजी,इत्यादी मैदानी खेळांच्या स्पर्धा आयोजित करणे. होतकरू खेळाडूंना स्विमिंग प्रशिक्षण देणे. बॉक्सींग,कराटे तसेच देशी विदेशी, क्रिडा स्पर्धाचे आयोजन करणे,नेहरू युवा केंद्र व खेल क्रिडा मंत्रालय मार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजना कार्यान्वीत करणे.

कृषी :- वन विकास महामंडळाने वेळोवेळी निर्गमित निर्णयानुसार वनाचे पूर्नजीवन व संरक्षण करणेकामी सहभागीहोणे. वनक्षेत्रामध्ये रोपवनाचे संगोपन, संरक्षण इत्यादी जबाबदाऱ्या पार पाडणे. वनविकास महामंडळाने धोरणानुसार महामंडळा मार्फत सहभागातून उपलब्ध होणारी विविध रोपे लादणे उदा- शेवगा, बोर, पेरू, शिताफळ, मोहफुल इ. जीवनोपयोगी वस्तू याची लागवड करणे व रोपवनाची देखभाल बाबत संयोजनाचा कालावधी निश्‍चित करणे. नैसर्गिक पूर्नउत्पत्तीचे क्षेत्र, वृक्षाची घनता वाटविण्यांबाबत उपाय योजना करणे. वनीकरणासाठी लागवडीच्या प्रजातीची निर्मिती करणे भूजलसंधारण कार्यक्रम राबविणे. वनसंवर्धन, वनसरंक्षण, वनविकास या व वनव्यवस्थापन संबंधी तर इतर कामाबाबत जनजागृती निर्माणा करून वनाचे सर्व प्रकारच्या नुकसानीपासून संरक्षण करणे. वन उपजांवर आधारीत प्रशिक्षण देणे. वनउपजावर आधारीत गरजा जसे जळावू सर्पन,इमारती लाकुड, फुले पाने इत्यादी गरजांना पर्याय शोधून वनांचे जास्तीत जास्त संवर्धन करणे गांवातील माहिला व पुरूषांना रोपवाटीका व नर्सरीचे प्रशिक्षण देणे, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जंगल सरक्षण व वन्य प्राणी संरक्षण विषयी विविध उपक्रम राबवीणे, पाणलोट क्षेत्र विकास मृदसंधारण,वृक्षारोपवन व बंध्धंधीसाठी जलसिंचनाचे उपक्रम राबवीणे तसेच आधुनीक पद्धतीने शेती करण्याचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहचवीणे, या साठी विविध उपक्रम राबविणे व सुगंधी वनौषधीची लागवड

For Lakshaya Foundation

President Secretary

S. R. Marathe

बेबी भगवान मराठे

सपना रोशन मराठे

अध्यक्ष/सही उपाध्यक्ष/सही सचिव/सही

लक्ष्य फांऊडेशन,पारोळा ता.पारोळा जि.जळगाव संस्थेचे नियम व नियमावली प्रमाणे ज्या कार्यकारी मंडळावर सह संस्थेची व्यवस्था वा कारभार सोपविण्यात आला आहे. अशा पहिल्या संस्थापक सभासदांची संपूर्ण नांवे, पत्ते, हुद्दे, वय, व्यवसाय, राष्ट्रीयत्व, व शिक्षण खालील प्रमाणे आहे.

| अ.न. | सभासदाचे नांव व पत्ता | वय | हुद्दा | व्यवसाय | शिक्षण | राष्ट्रीयत्व |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | **श्री. रोशन भगवान मराठे** रा.विद्या नगर धरणगांव रोड एंरडोल ता.एंरडोल जि.जळगाव | २९ | अध्यक्ष | व्यापार | एम.एस.डब्लु | भारतीय |
| २. | **सौ. बेबीबाई भगवान मराठे** रा.विद्या नगर धरणगांव रोड एंरडोल ता.एंरडोल जि.जळगाव | ४८ | उपाध्यक्ष | गृहिणी | ७.वी | भारतीय |
| ३. | **सौ. सपना रोशन मराठे** रा.विद्या नगर धरणगांव रोड एंरडोल ता.एंरडोल जि.जळगाव | २४ | सचिव | गृहिणी | डी.एड. | भारतीय |
| ४. | **सौ. मिना प्रकाश भोसले** रा.गंगा मातृछाया निवास भोसले गल्ली पारोळा ता.पारोळा जि.जळगाव | ४७ | सभासद | गृहिणी | ७.वी | भारतीय |
| ५. | **श्री. प्रविण प्रकाश भोसले** रा.गंगा मातृछाया निवास भोसले गल्ली पारोळा ता.पारोळा जि.जळगाव | २३ | सभासद | शेती | १०.वी | भारतीय |
| ६. | **श्री. सतिश प्रकाश भोसले** रा.गंगा मातृछाया निवास भोसले गल्ली पारोळा ता.पारोळा जि.जळगाव | २६ | सभासद | खा-नोकरी | बी.एस्सी. | भारतीय |
| ७. | **श्री. उज्वल भाऊलाल पाटील** रा.विद्या नगर धरणगांव रोड एंरडोल ता.एंरडोल जि.जळगाव | २४ | सभासद | शेती | डी.एड. | भारतीय |

स्थळ :-पारोळा

दिनांक :-22/7/२०१३

LAKSHAYA FOUNDATION
Reg.No. F-15079
JALGAON
PAN NO. AAAAL6938P
MAHARASHTRA

For Lakshaya Foundation

President

S.R.Marathe
Secretary

x
अध्यक्ष/सही

बेबी भगवान मराठे
x
उपाध्यक्ष/सही

सपना रोशन मराठे
x
सचिव/सही

लक्ष्य फांऊडेशन,पारोळा ता.पारोळा जि.जळगाव सदस्य जाहीर करतो की , संस्था नोंदणी अधिनियम १८६० अंतर्गत केलेली संस्था अस्तित्वात आणण्याची आमची इच्छा असून वरील उद्देशाने आम्ही एकत्र येवून **लक्ष्य फांऊडेशन,पारोळा ता.पारोळा जि.जळगाव** ही संस्था आज दिनांक ७ / ७ / २०१३ रोजी स्थापन केली असून ती संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी करण्यासाठी आम्ही या विधानपत्रावर सह्या केल्या आहेत.

| अ.नं. | सभासदाचे नांव | सही |
|---|---|---|
| १. | **श्री. रोशन भगवान मराठे**<br>रा.विद्या नगर धरणगांव रोड,एंरडोल ता.एंरडोल जि.जळगाव | |
| २. | **सौ. बेबीबाई भगवान मराठे**<br>रा.विद्या नगर धरणगांव रोड,एंरडोल ता.एंरडोल जि.जळगाव | बेबी भगवान मराठे |
| ३. | **सौ. सपना रोशन मराठे**<br>रा.विद्या नगर धरणगांव रोड,एंरडोल ता.एंरडोल जि.जळगाव | सपना रोशन मराठे |
| ४. | **सौ. मिना प्रकाश भोसले**<br>रा.गंगा मातृछाया निवास भोसले गल्ली,पारोळा ता.पारोळा जि.जळगाव | मिना प्रकाश भोसले |
| ५. | **श्री. प्रविण प्रकाश भोसले**<br>रा.गंगा मातृछाया निवास भोसले गल्ली,पारोळा ता.पारोळा जि.जळगाव | P.P.Bhosale |
| ६. | **श्री. सतिश प्रकाश भोसले**<br>रा.गंगा मातृछाया निवास भोसले गल्ली,पारोळा ता.पारोळा जि.जळगाव | S.P. Bhosale |
| ७. | **श्री. उज्वल भाऊलाल पाटील**<br>रा.विद्या नगर धरणगांव रोड,एंरडोल ता.एंरडोल जि.जळगाव | Ujwal. B. patil |

वरील सह्या करणाऱ्या इसमांना मी ओळखतो व त्यांनी माझ्या समक्ष या संमतीपत्रावर सह्या केल्या आहेत.

स्थळ :- **पारोळा**

तारीख :-२२/७ /२०१३

अॅडव्होकेट / ~~तहसीलदार~~
प्रविण देवालाल पुरभे
बि.कॉम.,एम.ए.,एल.एल.बी
अॅडव्होकेट
मु.पो.ता.धरणगांव जि.जळगांव

LAKSHAYA FOUNDATION
Reg.No. F-15079 JALGAON
MAHARASHTRA

For Lakshaya Foundation

President

S.R. Marathe
Secretary

चौ.क्र. 195/2024

ACC-2

## फेरफार अर्ज

संस्थेचे नांव : लक्ष्य फाउंडेशन, पारोळा ता. पारोळा जि. जळगांव

नोंदणी क्रमांक : (रजि. एफ - १५०७९/जळगांव)

कार्यालयाचा पत्ता : पारोळा ता. पारोळा जि. जळगांव

Ex. 8

| फेरफाराचे स्वरुप | फेरफाराची कारणमिमांसा. | शेरा |
|---|---|---|
| **जूने स्वरुप**<br>खालील नावे व पदे रेकॉर्डवर कमी करण्यात यावीत | कार्यकाळ संपल्यामुळे सदरील संस्थेचा सन २०१८ ते २०२३ चा कार्यकाळ संपुष्टात आल्याने सन २०२३ ते २०२८ साठी दिनांक. 09 / 09 / २०२३ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत निवड झाल्या प्रमाणे | १) नाहरकत पत्र<br>२) संमती पत्र<br>३) अजेंडा प्रत<br>४) अजेंडा पोहच<br>५) सर्वसाधारण सभेची झेरॉक्स प्रत |
| १) **डॉ. धिरजकुमार दिनकर मराठे** **अध्यक्ष**<br>रा. विद्या नगर, धरणगांव रोड, एरंडोल ता. एरंडोल जि. जळगांव<br>२) **विजय भाऊलाल पाटील** **उपाध्यक्ष**<br>रा. तापी बिल्डींग, PWD क्वार्टर, एरंडोल ता. एरंडोल जि. जळगांव<br>३) **राकेश भगवान मराठे** **सचिव**<br>रा. विद्या नगर, धरणगांव रोड, एरंडोल ता. एरंडोल जि. जळगांव<br>४) **रोशन भगवान मराठे** **सभासद**<br>रा. विद्या नगर, धरणगांव रोड, एरंडोल ता. एरंडोल जि. जळगांव<br>५) **प्रविण प्रकाश भोसले** **सभासद**<br>रा. गंगा मातृछाया निवास भोसले गल्ली, पारोळा ता. पारोळा जि. जळगांव<br>६) **सतिश प्रकाश भोसले** **सभासद**<br>रा. गंगा मातृछाया निवास भोसले गल्ली, पारोळा ता. पारोळा जि. जळगांव<br>७) **सपना रोशन मराठे** **सभासद**<br>रा. विद्या नगर, धरणगांव रोड, एरंडोल ता. एरंडोल जि. जळगांव | Regi. u/s 19, 22 ... A.C.C. Jalgaon<br>Issue notice to the outgoing trustees or persons affected if any. 7/11/23 | |

267/26

अर्जदाराचे नांव - अॅड. किरण ...
नक्कल सेवा शुल्क - 64
व ती मिळाल्याचा दि. - 09/02/26
नक्कल अर्ज मिळाल्याचा दि. - 20/01/26
नक्कल दिल्याचा दि. -
नक्कल तयार करणार -
नक्कल रुजवात करणार - 09/02/26

अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
जळगांव विभाग, जळगांव

LAKSHAYA FOUNDATION Reg.No. F-15079 JALGAON PAN NO. AAAAL6938P MAHARASHTRA

**For Lakshaya Foundation**

**President** **Secretary**

सहायक धर्मदाय आयुक्त जळगांव विभाग जळगांव

## नविन स्वरुप

संस्थेचे नांव : लक्ष्य फाऊंडेशन, पारोळा ता. पारोळा जि. जळगांव
नोंदणी क्रमांक : (रजि. एफ - १५०७९/जळगांव)
कार्यालयाचा पत्ता : पारोळा ता. पारोळा जि. जळगांव

नविन स्वरुप (२०२३ ते २०२८)
खालील नावे व पदे रेकॉर्डवर घेण्यात यावे

| क्र. | नांव व पत्ता | पद |
|---|---|---|
| १) | **रोशन भगवान मराठे**<br>रा. विद्या नगर, धरणगांव रोड, एरंडोल ता. एरंडोल जि. जळगांव | अध्यक्ष |
| २) | **सतिश प्रकाश भोसले**<br>रा. गंगा मातृछाया निवास भोसले गल्ली, पारोळा ता. पारोळा जि. जळगांव | उपाध्यक्ष |
| ३) | **सपना रोशन मराठे**<br>रा. विद्या नगर, धरणगांव रोड, एरंडोल ता. एरंडोल जि. जळगांव | सचिव |
| ४) | **भगवान भिला मराठे**<br>रा. वरखेडी ता. एरंडोल जि. जळगांव | सभासद |
| ५) | **धीरज वसंत लोहार**<br>रा. मांजरी बी. के. एनवी. हवेली मांजरी बु ता. जि. पुणे | सभासद |
| ६) | **योगीता प्रविण भोसले**<br>रा. गंगा मातृछाया निवास भोसले गल्ली, पारोळा ता. पारोळा जि. जळगांव | सभासद |
| ७) | **प्रविण प्रकाश भोसले**<br>रा. गंगा मातृछाया निवास भोसले गल्ली, पारोळा ता. पारोळा जि. जळगांव | सभासद |

P.P.Bhosale
प्रविण प्रकाश भोसले

### प्रतिज्ञालेख

मी प्रविण प्रकाश भोसले, वय - , व्यवसाय - नोकरी, रा. गंगा मातृछाया निवास भोसले गल्ली, पारोळा ता. पारोळा जि. जळगांव शपथेवर व सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की वरिल अर्जातील मजकूर माझ्या माहिती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्याच्या सत्यतेकरीता मी आज रोजी या प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी करीत आहे.

Signed Before Me
माझे समक्ष
Executive Magistrate
Jalgaon

P.P.Bhosale
प्रविण प्रकाश भोसले

LAKSHAYA FOUNDATION Reg.No. F-15079 JALGAON PAN NO. AAAAL6938P MAHARASHTRA

For Lakshaya Foundation

President

S. R. Marathe
Secretary

**BEFORE THE ASSISTANT CHARITY COMMISSIONER-II**
**JALGAON REGION, JALGAON.**
**(Presided over by Ms. S.V. Gharge)**

**Enquiry No.195/2024**
U/Sec. 22 of Maharashtra Public Trusts Act, 1950.

**In the matter of:**
Lakshya Foundation, Parola, Tq. Parola, Dist. Jalgaon.
(Reg.No.F-15079/Jalgaon)

**Exh.No.** 14

**ORDER BELOW EX.1**

Subject application is moved by the applicant / reporting trustee Pravin Prakash Bhosale under Sec.22 of Maharashtra Public Trusts Act, 1950 for reporting change taken place in the executive committee of public trust namely, Lakshya Foundation, Parola, Tq. Parola, Dist.Jalgaon registered at registration No.F-15079/Jalgaon. The inquiry is unchallenged / undisputed.

02. The applicant has come up with a case that the aforesaid public trust is registered under Maharashtra Public Trusts Act, 1950 bearing registration No.F-15079/Jalgaon. As per the rules & regulations of the trust, tenure of acting executive committee has completed. Hence, on 01-01-2023 an annual general meeting was arranged. In said meeting fresh / new executive committee was elected for tenure of 2023 to 2028. Therefore, present change report/application is filed for reporting said change.

03. The application is supported by the no objection of outgoing trustees at Exh.03, consent letter of incoming trustees at Exh.02, list of members' at Exh.12 and evidence closed pursis at Exh.13. The applicant has filed certified copy of public trust registration application, constitution / rules & regulations of the trust

LAKSHAYA FOUNDATION Reg.No. F-15079 JALGAON PAN NO. AAAAL6938P MAHARASHTRA

For Lakshaya Foundation
President
Secretary

at Exhs. 06, 07 & 08 in change report Enquiry No.196/2024 of the said trust.

04. Notices were issued vide Exh.05 and it was duly served. Reports / acknowledgment receipts are at Exh.06 to 08. No one has raised objection to the reported change.

05. Applicant has filed his evidence affidavit at Exh.09. The contents in the affidavit are well supported by minutes of proceeding book extract of annual general meeting dated 01-01-2023 at Exh.11 and its agenda & agenda received at Exh.10.

06. To the satisfaction of this authority, the change is according to the rules & regulations of the trust. Therefore, the change is legal & valid. Hence, proceed to pass following order -

**ORDER**

1) The Enquiry Change report No.195/2024 is accepted.
2) The entry of the said shall be taken in Schedule-1 of Public Trust register for the tenure 2023 to 2028.

Date: 10-07-2024
Place: Jalgaon

(Ms. S.V. Gharge)
Assistant Charity Commissioner-II,
Jalgaon Region, Jalgaon.

TRUE COPY
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी
कार्यालय, जळगांव विभाग

LAKSHAYA FOUNDATION
Reg.No. F-15079
JALGAON
PAN NO. AAAAL6938P
MAHARASHTRA

For Lakshaya Foundation

President

S. R. MaRathe
Secretary

# फेरफार अर्ज

संस्थेचे नांव : लक्ष्य फाऊंडेशन, पारोळा ता. पारोळा जि. जळगांव
नोंदणी क्रमांक : (रजि. एफ - १५०७९/जळगांव)
कार्यालयाचा पत्ता : पारोळा ता. पारोळा जि. जळगांव

| फेरफाराचे स्वरुप | फेरफाराची कारणे | शेरा |
|---|---|---|
| **जूने स्वरुप**<br>खालील नावे व पदे रेकॉर्डवर कमी करण्यात यावीत<br><br>१) भगवान भिला मराठे — सभासद<br>रा. धरखेडी ता. एरंडोल जि. जळगांव<br>२) धीरज वसंत लोहार — सभासद<br>रा. मांजरी बी. के. एनवी. हवेली मांजरी बु<br>ता. जि. पुणे | संस्थेच्या कार्यकारी मंडळातील मुदतपूर्व रिक्त झालेल्या जागी दि. 23/06/2025 रोजीच्या कार्यकारी मंडळातील ठरावानुसार नविन सभासदांची निवड करण्यात आली. | १) [illegible]<br>२) [illegible]<br>३) [illegible]<br>४) [illegible]<br>५) [illegible]<br>[illegible]<br>[illegible] |
| *नविन स्वरुप*<br><br>१) विनय सुहास महाजन — सभासद<br>रा. २०/ब, धरणगांव रोड, विद्यानगर, एरंडोल<br>ता. एरंडोल जि. जळगांव<br><br>२) अमन रऊफ शेख — सभासद<br>रा. सर्व्हे नं. १५/बी/१२, इकरा कॉलेज जवळ, मेहरुण जळगांव ता. जि. जळगांव | | |

P.P. Bhosale
(प्रविण प्रकाश भोसले)

## प्रतिज्ञापत्र

मी प्रविण प्रकाश भोसले, वय - ३४, व्यवसाय - नोकरी, रा. गंगा मातृछाया निवास भोसले गल्ली, पारोळा ता. पारोळा जि. जळगांव शपथेवर व सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की वरिल अर्जातील माहिती माझ्या माहिती प्रमाणे खरा व बरोबर आहे. त्याच्या सत्यतेकरीता मी आज रोजी या प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी करीत आहे.

For Lakshaya Foundation
President — Secretary
S.R. Marathe

P.P. Bhosale
(प्रविण प्रकाश भोसले)

SIGNED BEFORE ME
माझे समक्ष

Balkrishna Govindrao Kapure
Advocate And Notary (Govt.of India)
Sai Villa Behind Rellince Petroal Pump
Tal.Chopda,Dist.Jalgaon- (M.S.)

NOTARIAL NOTARIAL